# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ २४ /२०२३ दि. १८/०२/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** कल्याण डोबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात व उल्हासनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत शिव मंदिर, पवई चौक येथे **'महाशिवरात्री'** निमित्त सालाबादप्रमाणे महाशिवरात्रौत्सव साजरा करण्यात येतो. गतवर्षीप्रमाणे यावर्षी दिनांक १८/०२/२०२३ रोजी **'महाशिवरात्री'** निमित्त सदर परिसरातील भाविक दर्शनाकरीता येत असल्याने शास्त्री चौक ते पवई चौक दरम्यान रस्त्यावर दोन्ही बाजूस मिठाई, खेळणी, इतर मनोरंजन व शोभेच्या वस्तू विकणारे विक्रेते बसतात. त्यामुळे सदर भागास जत्रेचे स्वरूप प्राप्त होते. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** उल्हासनगर शास्त्री चौक ते पवई चौकाकडे दोन्ही बाजूनी येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना शास्त्री चौक व पवई चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** १) सदरची वाहने डर्बी चौक, स्मशानभूमी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.
२) सदरची वाहने रिलायन्स पेट्रोल पंप, हडकमई माता चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दि. १८/०२/२०२३ रोजी सकाळी ०६:०० ते रात्रौ २३.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहीतीसाठी,**

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
– मा. जिल्हाधिकारी, ठाणे
– मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
– मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ४, उल्हासनगर
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
– सहा. पोलीस आयुक्त, अंबरनाथ विभाग/वाहतुक शाखा, उल्हासनगर
– परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
– नियंत्रण कक्ष, ठाणे/उल्हासनगर शहर, – ठाणे पोलीस पत्रक

CamScanner